महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

विद्यापीठ आशियात १९०व्या स्थानी

गेल्या वर्षीपेक्षा कामगिरीत सुधारणा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'टाइम्स हायर एज्युकेशन'च्या आशिया क्रमवारीत पहिल्या दोनशे उच्च शिक्षण संस्थांमध्ये राज्यातील केवळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा समावेश झाला असून, विद्यापीठ १९० व्या स्थानी आले आहे. गेल्या वर्षी विद्यापीठ हे २०० ते २५१ या गटात होते. त्याचप्रमाणे वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये विद्यापीठाचा ८०१ ते १००० या क्रमवारीत समावेश झाला आहे. त्यामुळे विद्यापीठाने यंदाच्या कामगिरीत सुधारणा करून मोठी झेप घेतली आहे. बेंगळुरूच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने ४८ वे स्थान पटकावले आहे.

'टाइम्स हायर एज्युकेशन'ची आशिया क्रमवारी २०२३ नुकतीच जाहीर करण्यात आली. अध्यापन, संशोधन, सायटेशन्स, आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन असे एकूण १३ निकष विचारांत घेऊन उच्च शिक्षण संस्थांचे क्रमवारीसाठी मूल्यमापन करण्यात येते. त्यानुसार ही क्रमवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने ४८ वे स्थान पटकावले आहे. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत या संस्थेची सहा स्थानांनी घसरण झाली आहे. राज्यातील केवळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठालाच क्रमवारीतील पहिल्या दोनशे संस्थांमध्ये स्थान प्राप्त करता आले. २०१-२५० या गटात पुण्याचे सिम्बायोसिस विद्यापीठ, मुंबईचे इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, ३५१ ते ४०० या गटात भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (आयसर, पुणे), ४०१ ते ५०० या गटात मुंबई विद्यापीठाचा समावेश आहे.

दरम्यान, गेल्या वर्षी वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये पुणे विद्यापीठ हे ८०१ ते १००० या क्रमवारीच्या गटात होते. तर, यंदा विद्यापीठाचे स्थान हे ६०१ ते ८०० च्या दरम्यान आहे, अशी माहिती विद्यापीठाने दिली आहे.

"सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी गेल्या वर्षभरात शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केल्यामुळे क्रमवारीत वाढ झाली आहे. पुढील सहा महिन्यांत पुणे विद्यापीठाच्या क्रमवारीत वाढ झालेली दिसेल.

- डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने क्रमवारीच्या सर्वच निकषांमध्ये चांगली कामगिरी केली आहे. संशोधनामध्ये अगदी थोड्या प्रमाणात गुणांकन कमी झालेले दिसले. मात्र, पुणे विद्यापीठाला शैक्षणिक गुणवत्तेत पुढे नेण्याच्या उपाययोजना तयार असून, त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

- डॉ. संजय ढोले, प्रमुख, आयक्यूएसी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

'ईडब्ल्यूएस'ला निम्मी फी

त्वरित अंमलबजावणी करण्याच्या खासगी विद्यापीठांना सूचना

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यातील स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांमध्ये (खासगी) १० टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. ही सवलत संबंधित अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यापासून अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी लागू राहील. निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. या सवलतीबाबत खासगी विद्यापीठांना सरकारककडून कोणतेही अनुदान किंवा अन्य आर्थिक साह्य मिळणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचा निर्णय प्रसिद्ध केला आहे. या निर्णयाबाबत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी काही दिवसांपूर्वी सूतोवाच केले होते. राज्यातील खासगी विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही सरकारकडून शैक्षणिक शुल्क सवलती देण्यात येत नाहीत. या विद्यापीठांमध्ये तुलनात्मकदृष्ट्या दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक सुविधा आणि आकारण्यात येणारे शुल्क हे जादा आहे. त्यामुळे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या विद्यार्थ्यांना खासगी विद्यापीठात प्रवेश घेताना आकारण्यात येणारे शुल्क भरणे अडचणीचे आहे. अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना इच्छा असूनही, प्रवेश घेता येत नाही. या पार्श्वभूमीवर खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी संख्येच्या एकूण दहा टक्के इतक्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कात ५० टक्के सवलत खासगी विद्यापीठांना देणे अनिवार्य करण्यात आले आहे. या शुल्कात विद्यापीठ कोणत्याही नावाने आकारत असलेल्या सर्व शुल्कांचा समावेश राहणार आहे. राज्यातील खासगी विद्यापीठांनी या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कात सवलत देण्याबाबतची प्रक्रिया ही विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष प्रवेशावेळीच करणे आवश्यक राहणार आहे, असे निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

कमी विद्यार्थ्यांना निर्णयाचा लाभ

या निर्णयानुसार खासगी विद्यापीठांना १० टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कात ५० टक्के सवलत द्यावी लागणार आहे. त्यानुसार अनेक विद्यार्थी हे प्रवेशासाठी पात्र ठरणार आहेत. मात्र, १० टक्के ही फारच कमी संख्या असल्याने, अनेक विद्यार्थ्यांना निर्णयाचा लाभ घेता येणार नाही. त्यातच विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी निवडणार कसे, हा प्रश्नही निर्माण होणार आहे.

राज्य सरकारकडून आढावा

या निर्णयानुसार प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर खासगी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती एका महिन्याच्या आत राज्य सरकारकडे सादर करावी लागणार आहे. या माहितीचा आढावा राज्य सरकारकडून घेण्यात येणार आहे, अशी माहिती सरकारकडून देण्यात आली आहे.

जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी नोंदणी करा

जिल्ह्यातील उमेदवारांना भाग घेण्याचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

जागतिक कौशल्य स्पर्धा पुढील वर्षी लिओनमध्ये (फ्रान्स) होणार आहेत. या स्पर्धेत उमेदवारांची निवड होण्यासाठी जिल्हास्तरावर कौशल्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, या पूर्वतयारीच्या निवडीसाठी जिल्ह्यातील अधिकाधिक उमेदवारांनी भाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे प्रभारी सहायक आयुक्त सा. बा. मोहिते यांनी केले आहे.

या स्पर्धेच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने संबंधित जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्किल कौन्सिल, विविध औद्योगिक आस्थापना यांच्या सहकार्याने ५२ क्षेत्रांमध्ये कौशल्य स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. कौशल्य स्पर्धेचे जिल्हा, विभाग, राज्य; तसेच देश पातळीवर आयोजन करून निवड केलेल्या उमेदवारांची नावे पुढील जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत. जागतिक कौशल्य स्पर्धा २०२४ साठी वयोमर्यादा हा एकमेव निकष असून, ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डिजिटल बांधकाम, औद्योगिक डिझाइन तंत्रज्ञान, इंडस्ट्री ४.० माहिती नेटवर्क गॅबलिंग, मेकॅट्रॉनिक्स, रोबोट सिस्टीम एकत्रीकरण आणि जल तंत्रज्ञान या क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म एक जानेवारी १९९९ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे. त्याबरोबरच इतर क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म एक जानेवारी २००२ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे.

कौशल्य स्पर्धेचे वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. निवड होणाऱ्या उमेदवारांना महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत वेळोवेळी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी कौशल्य विकास विभागाच्या https://kaushalya.mahaswayam.gov.in या वेबसाइटवर जाऊन नाव नोंदणी करावी, असे आवाहन केंद्राने केले आहे.

डॉक्टर होण्याचा ध्यास...

हडपसर : वडिलांचे छत्र हरपल्यानंतर आई व बहिणीसह घरच्यांनी घराबाहेर काढलेल्या श्रुती पोतदार हिने दहावीच्या परीक्षेत ९३ टक्के गुण मिळविले आहेत. एका पायाने दिव्यांग असलेल्या श्रुतीचे डॉक्टर होण्याचे स्वप्न असून, तिला आणखी यश मिळवून आई आणि इतरांचे दुःख हलके करायचे आहे.

घरच्यांनी बाहेर काढल्यानंतर श्रुतीची आई सुवर्णा पोतदार यांनी आपल्या आईचे घर गाठले. मात्र, त्यांना आईचा आधार लाभला नाही. त्यांचे अचानक निधन झाल्याने पोतदार कुटुंब फुरसुंगी येथे मामाकडे आले. मामाच्या शेजारी भाड्याने खोली घेऊन त्या तिघी राहत आहेत. मामाची परिस्थितीही बिकट आहे. त्यामुळे सुवर्णा हडपसर औद्योगिक वसाहत येथील गीट्स कंपनीमध्ये हेल्पर म्हणून काम करीत आहेत. त्यांना महिना नऊ हजार पगार मिळतो. घरभाडे साडेतीन हजार रुपये देऊन घरखर्च भागवताना त्यांची तारेवरची कसरत श्रुतीने पाहिली आणि दहावीत चांगले यश मिळविण्याचा निर्धार केला. आर्थिक चणचणीमुळे तिला शिकवणी लावता आली नाही. मात्र, अभ्यासात खंड पडू न देता तिने ९३ टक्के गुण मिळविले.

श्रुती उजव्या पायाने दिव्यांग आहे. तिचा उजवा पाय उंचीला दीड इंच कमी आहे. त्यामुळे तिला सर्वसामान्यांसारखे सरळ चालता येत नाही, तर अडखळत चालावे लागते. वडिलांचा आजाराने मृत्यू झालेला पाहिल्यापासून श्रुतीला डॉक्टर बनायची इच्छा आहे. डॉक्टर बनून तिला आर्थिक सक्षम बनायचे आहे आणि घरच्यांवरील संकट दूर करायचे आहे.

"आयुष्याचा जोडीदार गेल्यानंतर डोक्यावरचे छप्परही गेले. दोन्ही मुलींनी भरपूर शिकावे, ही माझी इच्छा आहे. श्रुतीने जिद्दीने अभ्यास करून चांगले यश मिळविले आहे. तिच्या शिक्षकांनी तिला चांगले मार्गदर्शन केले.

- सुवर्णा पोतदार, श्रुतीची आई

कम्प्युटर इंजिनीअरिंगचे स्वप्न...

पिंपरी : विकट आर्थिक परिस्थिती असतानाही सातत्यपूर्ण अभ्यास करून सुप्रिया रोहिदास कोळी हिने दहावीच्या परीक्षेत ९७.२० टक्के गुण प्राप्त केले असून, कम्प्युटर इंजिनीअर होण्याचे तिचे स्वप्न आहे. दहावीत उत्तम यश मिळविलेल्या सुप्रियाला पुढील शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये, अशी तिच्या पालकांची अपेक्षा आहे.

गावात सगळ्यांच्याच घरी स्वच्छतागृह होते. मात्र, कोळी कुटुंबीयांचे घर खूप जुने असल्याने; तसेच घरात स्वच्छतागृह नसल्याने या कुटुंबाला सार्वजनिक स्वच्छतागृहाचा वापर करावा लागत होता. पावसाळ्यात सार्वजनिक स्वच्छतागृह तुंबत असत. त्या वेळी त्याचा वापरही करणे कठीण व्हायचे. अशा परिस्थितीत मुलांसाठी स्वच्छतागृह बांधण्याचे काम सुप्रियाचे वडील रोहिदास कोळी यांनी केले. दहावीच्याच वर्षात घराचे हे काम सुरू असतानाही सुप्रियाने अभ्यासाकडे दुर्लक्ष केले नाही. घरापासून शाळाही लांब असल्याने तिने कधी चालत, तर कधी बसने प्रवास केला. तिने घेतलेल्या कष्टांना चांगले फळ मिळाले आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या श्री शिवाजी विद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान तिने मिळवला.

सुप्रिया कोळी तिच्या आईसह.

"मला खूप शिकण्याची इच्छा होती. घरातले सातवीतच लग्न लावायला निघाले असताना मी घरातून शिक्षणासाठी पळ काढला होता. पहिला नंबर मी सोडला नाही. आता सुप्रियाच्या रूपाने शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्याची माझी इच्छा आहे. मुलीला चांगले शिक्षण द्यायचे आहे.

- लक्ष्मी कोळी, सुप्रियाची आई

'एआयएसएसएमएस' अभियांत्रिकी महाविद्यालयाला एनबीए मूल्यांकन

पुणे : नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन (एनबीए) मूल्यांकन समितीने 'एआयएसएसएमएस' अभियांत्रिकी महाविद्यालयाला भेट दिली. या वेळी समितीने अभियांत्रिकी महाविद्यालयातील शैक्षणिक दर्जा आणि सर्व सोयीसुविधांची सत्यता पडताळली. कम्प्युटर, स्थापत्य, केमिकल, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, मेकॅनिकल सँडविच आदी इंजिनीअरिंगच्या सहा शाखांना पुढील तीन शैक्षणिक वर्षांसाठी अधिस्वीकृती मान्यता दिली.

'एआयएसएसएमएस' अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बोरमणे, एनबीए समन्वयक डॉ. मंगेश फाटे, विभाग प्रमुख आदींनी मानांकन मिळवण्यासाठी परिश्रम घेतले. सोसायटीचे मानद सचिव मालोजीराजे छत्रपती, सहसचिव सुरेश शिंदे, खजिनदार अजय पाटील, नियामक मंडळाचे चेअरमन विश्वासराव पाटील, व्यवस्थापन समितीचे चेअरमन ॲड. भगवानराव साळुंखे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

'एसटीपीआय' स्टार्टअप्सना सक्षम करणार

महासंचालक अरविंद कुमार यांचे आश्वासन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'तंत्रज्ञानात दररोज तयार होणाऱ्या नवकल्पनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. विशेषतः पुण्यासारख्या शहरात ऑटोमोटिव्ह क्षेत्रात स्टार्टअपद्वारे नवसंकल्पनांच्या आधारे तंत्रज्ञान विकसित करून नागरिकांच्या वाहतुकीचा प्रश्न सोडवण्यासाठी तरुणांचे प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत. सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया (एसटीपीआय) अशा स्टार्टअप्सना आणखी सक्षम करतील,' असे आश्वासन 'एसटीपीआय'चे महासंचालक अरविंद कुमार यांनी शुक्रवारी दिले.

'एसटीपीआय, पुणे'तर्फे ऑटोमोटिव्ह क्षेत्रासाठी सुरू करण्यात आलेल्या 'मोशन' या सेंटर फॉर आंत्रप्रेन्युअर्सतर्फे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या सेंटरतर्फे 'ओपन चॅलेंज प्रोग्राम' सुरू करण्यात आला आहे. ज्या अंतर्गत नवसंकल्पना आणि तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या तरुण उद्योजकांना त्यांचे स्टार्टअप उभारण्यासाठी बळ दिले जाणार आहे. या उपक्रमाचा श्रीगणेशा अरविंद कुमार यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी राज्याचे अतिरिक्त प्रधान सचिव बिपिनकुमार श्रीमाळी, मोशन केंद्राचे प्रमुख मार्गदर्शक गणेश नटराजन, 'एसटीपीआय पुणे'चे संचालक डॉ. संजय कुमार गुप्ता आदी उपस्थित होते.

''एसटीपीआय'कडून देशभरात २२ केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. यामार्फत विविध क्षेत्रात नवतंत्रज्ञान विकसित करून ते बाजारात आणणाऱ्या तरुणांना बळ दिले जात आहे. स्टार्टअप्सना निधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवल्या जात आहेत. महाराष्ट्रातही 'मोशन' व 'फसल' या दोन केंद्रांच्या माध्यमातून स्टार्टअप्सना उभारणी मिळत आहे. तरुणांच्या कल्पनांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी हवी ती मदत केली जाईल,' असे कुमार यांनी सांगितले. 'महात्मा फुले रिन्युएबल एनर्जी अँड इन्फ्रास्ट्रक्चर टेक्नॉलॉजी लिमिटेड'द्वारे अनुसुचित जमातीतील तरुणांना स्टार्टअपसाठी केल्या जाणाऱ्या सहकार्याबद्दल श्रीमाळी यांनी सांगितले. गणेश नटराजन, डॉ. गुप्ता यांनीही विचार मांडले. कार्यक्रमात 'एसटीपीआय'च्या यशस्वी स्टार्टअप्सचा सन्मान करण्यात आला.

तीन लाखांचा ऐवज लंपास

पुणे : येरवडा भागातील सोसायटीतील सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी तीन लाख ५६ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

नरेश चौधरी (वय ३५, रा. सुमा सोसायटी, येरवडा) यांनी येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चोरट्यांनी चौधरींच्या सदनिकेचे कुलूप तोडून कपाटातील ऐवज लांबविला. पोलिस उपनिरीक्षक अंकुश डोंबाळे तपास करीत आहेत.

प्रपत्र जी

स्वारस्याची अभिव्यक्ती ("ईओआय") करिता आमंत्रण

परफेक्ट इंजिन कॉम्पोनेंट्स प्रायव्हेट लिमिटेड

ऑटोमोटिव्ह अभियांत्रिकी ॲक्सेसरीजच्या निर्मितीमध्ये कार्यरत

(इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी (इन्सॉल्व्हन्सी रिझोल्यूशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ३६ए(१) अंतर्गत)

<table>
<tr><th colspan="2">संबंधित तपशील</th></tr>
<tr><td>१. पॅन/सीआयएन/एलएलपी क्र. सह कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव</td><td>परफेक्ट इंजिन कॉम्पोनेंट्स प्रायव्हेट लिमिटेड
पॅन: एएआयसीएस७१८६ई
CIN: U29120MH2005PTC150632</td></tr>
<tr><td>२. नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता</td><td>११०१ विराज टॉवर्स, अंधेरी कुर्ला रोड जंक्शन, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, अंधेरी (पू), मुंबई - ४०००६९</td></tr>
<tr><td>३. वेबसाइटची यूआरएल</td><td>http://www.peclindia.com</td></tr>
<tr><td>४. बहुतेक स्थावर मालमत्ता असलेल्या ठिकाणाचा तपशील</td><td>गट क्र. ७६८, गाव सहजपूर, दौंड, महाराष्ट्र-४१२२०२</td></tr>
<tr><td>५. कॉर्पोरेट कर्जदाराच्या मुख्य उत्पादने/सेवा कार्यपद्धती (कोणतेही असल्यास) स्थापित क्षमता</td><td>वॉल्व -१४,००० युनिट्स/दिवस</td></tr>
<tr><td>६. आर्थिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये विकल्या गेलेल्या मुख्य उत्पादनांचे/सेवांचे प्रमाण आणि मूल्य</td><td><table><tr><th>अ. क्र.</th><th>उत्पादन</th><th>प्रमाण (अंदाजे)</th><th>मूल्य</th></tr><tr><td>१</td><td>वॉल्व</td><td>२३,३७,१३४</td><td>१,८७१ लाख</td></tr><tr><td>२</td><td>वॉल्व सीट इन्सर्ट</td><td>९,३९,९३७</td><td>१,७२६ लाख</td></tr><tr><td>३</td><td>वॉल्व गाईड्स</td><td>३,०६,५८८</td><td>१२० लाख</td></tr></table></td></tr>
<tr><td>७. २५.०४.२०२३ रोजी पर्यंत कर्मचारी/कामगारांची संख्या</td><td>वेतनावर:
कर्मचारी: ८२
कामगार: ४८
कंत्राटी तत्वावर: कामगार: १०५</td></tr>
<tr><td>८. दोन वर्षांची शेवटची उपलब्ध आर्थिक विवरणपत्रे (अनुसूचीसह), कर्जदारांच्या याद्या, प्रक्रियेतील त्यानंतरच्या घडामोडींच्या संबंधित तारखांसह इतर तपशील येथे उपलब्ध आहेत:</td><td>http://arck.in, केस सूची अंतर्गत "परफेक्ट इंजिन कॉम्पोनेंट्स प्रायव्हेट लिमिटेड"</td></tr>
<tr><td>९. संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत रिझॉल्यूशन अर्जदारांसाठी पात्रता येथे उपलब्ध आहे:</td><td>रिझॉल्यूशन प्लॅनसह रिझॉल्यूशन प्रोफेशनल ("आरपी") शी संपर्क साधण्यासाठी रिझॉल्यूशन अर्जदारांसाठी किमान पात्रता निकष (एकटे, संयुक्तपणे किंवा कंसोर्टियममध्ये) :-
१. बॉडी कॉर्पोरेट्स आणि इतर व्यक्तींसाठी: कागदोपत्री पुराव्यांद्वारे समर्थित किमान निव्वळ रु. १० कोटी
२. एआरसी/एनबीएफसी/एआयएफ सह वित्तीय संस्थांसाठी:
३१-०३-२०२२ पूर्वी नवीनतम उपलब्ध ताळेबंदानुसार रु. १०० कोटींच्या गुंतवणुकीसाठी एयूएम/निधी उपयोजन/कमिटेड फंड*.
*एआरसीचा सहभाग भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियम आणि विनियमांच्या अधीन आहे.
उपरोक्त दोन श्रेणीतील अर्जदारांमध्ये भिन्न पात्रता निकष असल्यास, पात्रता संघातील त्यांच्या वाट्याच्या प्रमाणात गणली जाईल.
संपूर्ण तपशील/तपशीलवार ईओआय वेबसाइट www.arck.in वर उपलब्ध आहे किंवा pecomponents.ibc@gmail.com वर ई-मेलद्वारे मागवली जाऊ शकते.</td></tr>
<tr><td>१०. स्वारस्याची अभिव्यक्ती प्राप्तीकरिता शेवटची तारीख</td><td>१४.०७.२०२३</td></tr>
<tr><td>११. संभाव्य रिझॉल्यूशन अर्जदारांची अस्थायी यादी जारी करण्याची तारीख</td><td>१९.०७.२०२३</td></tr>
<tr><td>१२. अस्थायी यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख</td><td>२४.०७.२०२३</td></tr>
<tr><td>१३. ईओआय सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी</td><td>pecomponents.ibc@gmail.com</td></tr>
</table>

परफेक्ट इंजिन कॉम्पोनेंट्स प्रायव्हेट लिमिटेड करिता
अनिल कोहली, नियुक्त भागीदार आणि अधिकृत स्वाक्षरीकर्ता
एआरसीके रिझॉल्यूशन प्रोफेशनल्स एलएलपी - रिझॉल्यूशन प्रोफेशनल
आयबीबीआय/आयपीई-००३०/आयपीए-१/२०२२-२३/५००१३
एएफए पर्यंत वैध: २२.१२.२०२३
पत्ता: ४०९, अन्सल भवन, १६ के.जी. मार्ग, कॅनॉट प्लेस, नवी दिल्ली - ११०००१
ईमेल: pecomponents.ibc@gmail.com, मोबा.: ९८१००७११८२

दिनांक: २४.०६.२०२३
ठिकाण: मुंबई

जाहीर नोटीस

खराडी, ता. हवेली, जि. पुणे येथील सर्व्हे नं. ३२/१ एकूण क्षेत्र ०१ हेक्टर ०९ आर पैकी क्षेत्र ०० हेक्टर ०.९३ आर म्हणजेच ९३ चौ. मी. यांसी चतुःसीमा- **पू.** : सर्व्हे नं. ३२/१ पैकी मिरले व सुर्यवंशी यांची मिळकत, **द.** : सर्व्हे नं. ३३/२ पैकी मंगल शिवाजी चांधेरे व इतर यांची मिळकत, **प.** : सर्व्हे नं. ३२/१ पैकी हिराबाई हिरामण वाडेकर यांची मिळकत, **उ.** : सर्व्हे नं. ३२/१ पैकी अविनाश धोंडीराम गाडे यांची मिळकत, ही मिळकत **हरिश्चंद्र नारायण अंधारे**, रा. खराडी, पुणे यांचे मालकीची आहे, मी ॲड. नितीन ओंबळे यांस सदर मालकाने सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत चौकशी करून त्याचा दाखला द्यावयास सांगितले आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिन, लिज, कोर्टवाद, वाटप, दावा, वारसाहक्क, करार, खरेदीखत, मुखत्यार, अगर इतर कुठल्याही तत्सम कारणाद्वारे हक्क असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासून **७ दिवसांचे आत** आवश्यक कागदपत्रांसह माझी खात्री करून द्यावी. या सात दिवसात कोणाचीही तक्रार न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही.

पुणे, दिनांक : २३/०६/२०२३

ॲड. नितिन जी. ओंबळे
फ्लॅट नं. ४, ओमशंकर बिल्डींग,
सीटीएस नं. ८९६/१, रविवार पेठ, पुणे ४११००२. मो. ९८२२१९६३२८

जाहीर नोटीस

खराडी, ता. हवेली, जि. पुणे येथील सर्व्हे नं. ३२/१ एकूण क्षेत्र ०१ हेक्टर ०९ आर पैकी क्षेत्र ०० हेक्टर ०१.९५ आर म्हणजेच १९५ चौ.मी. यांसी चतुःसीमा- **पू.** : सर्व्हे नं.३२/१ पैकी कुंभार व जगदाळे यांची मिळकत, **द.** : सर्व्हे नं. ३२/१ पैकी हरिश्चंद्र नारायण अंधारे यांची मिळकत, **प.** : सर्व्हे नं. ३२/१ पैकी हिराबाई हिरामण वाडेकर यांची मिळकत, **उ.** : सर्व्हे नं. ३२/१ पैकी मारूती दिगंबर गलांडे यांची मिळकत, ही मिळकत **अविनाश धोंडीराम गाडे**, रा. विमाननगर, पुणे यांचे मालकीची आहे, मी ॲड. नितीन ओंबळे यांस सदर मालकाने सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत चौकशी करून त्याचा दाखला द्यावयास सांगितले आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिन, लिज, कोर्टवाद, वाटप, दावा, वारसाहक्क, करार, खरेदीखत, मुखत्यार, अगर इतर कुठल्याही तत्सम कारणाद्वारे हक्क असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासून **७ दिवसांचे आत** आवश्यक कागदपत्रांसह माझी खात्री करून द्यावी. या सात दिवसात कोणाचीही तक्रार न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही.

पुणे, दिनांक : २३/०६/२०२३

ॲड. नितिन जी. ओंबळे
फ्लॅट नं. ४, ओमशंकर बिल्डींग,
सीटीएस नं. ८९६/१, रविवार पेठ, पुणे ४११००२. मो. ९८२२१९६३२८

बारामती नगरपरिषद, बारामती
जाहिर निविदा सुचना

(महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती, औदयोगीक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०३ अन्वये)

जा. क्र. बानप/कार्या- ११/वा. ले/५४ / २०२३ दिनांक- २२/०६/२०२३ अन्वये सर्व संबंधितांना कळविणेत येते की, बारामती नगरपरिषदेचा सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचा वार्षिक लेखा प्रशासकीय ठराव क्र. ५८ विषय क्र. ५८ दिनांक- ३१/०५/२०२३ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे. सदर लेखा नगरपरिषद क्षेत्रातील रहिवाशांना निरिक्षणास नगरपरिषदेच्या http://baramatimahaulb.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व नगरपरिषद लेखा विभागाकडे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

स्थळ- बारामती
दिनांक - २२/०६/२०२३

स्वाक्षरी/-
(महेश रोकडे)
मुख्याधिकारी (गट-अ)
बारामती नगरपरिषद, बारामती

Shri Markandey Solapur Sahakari Rugnalaya & Research Centre Niy., Solapur

Final Plot No. 19/2, Pachha Peth, Solapur - 413005 Contact No. - 0217-245 2123 / 24

Notice for short-listing of Interior Work

On behalf of our client, we propose to short list contractors/ sub contractors and suppliers for various work-scopes (as provided below), to undertake Interior activities and to provide a complete manufacturing facility at hospital, which will be located at Solapur.

Categories & Basic Criterion

Modular work / Chairs work / Carpentry work :
Companies that have previously successfully executed at least two Similar projects in the last 12 months.

Applications are invited from reputed, experienced & qualified contractors, in our prescribed format. Application forms should be downloaded from www.markandeyarugnalaya.com on or before 30/06/2023 & completed duly filled in forms be submitted on or before 03/07/2023 7.00pm to Shri MSSRN (tendermssrn@gmail.com)

For further details contact – Mr.Shubham 99229 30809

Dr. Vijaykumar R. Arkal - MBBS, DCH - Chairman

पुणे महानगरपालिका

शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना
सभासदत्व घेणेबाबत माहिती

शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना ही पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पिवळे रेशनकार्डधारक, ग.व.नि. सेवाशुल्क धारक व केशरी रेशनकार्डधारक ज्यांचे वार्षिक उत्पन्न र. रु. एक लाखापर्यंत असणाऱ्या गरीब कुटुंबियांसाठी दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत लागू करण्यात येते. तथापि ही सवलत फक्त जे नागरीक आरोग्य विमा योजनेचे सभासद होतील त्यांच्यापुरतीच लागू राहील. तसेच हि योजना फक्त जनरल वॉर्डसाठी लागू आहे. सेमी-प्रायव्हेट, प्रायव्हेट व डिलक्स रूम घेणाऱ्या रुग्णाला या योजनेचा फायदा मिळणार नाही. शहरी गरीब वैद्यकीय योजनेअंतर्गत पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटलमधील अंतर्रुग्ण विभागातील वैद्यकीय उपचारांसाठी सी.जी.एस.एस. मान्य दराने ५०% किंवा १०० % हमीपत्रांतर्गत एका वर्षासाठी एका कुटुंबाला जास्तीत जास्त एक लाख किंवा दोन लाख (किडनी, हृदयरोग व कॅन्सर) या कमाल मर्यादेपर्यंत खर्च करण्यात येतो. या मर्यादेपेक्षा जास्त होणारा खर्च संबंधित रुग्णाने भरणे आवश्यक आहे.

सदर योजनेचे सभासदत्व घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

१) मनपा झोपडपट्टीत राहत असल्याचे ग.व.नि. विभागाचे चालू आर्थिक वर्षाचे सेवा शुल्क भरलेली पावती किंवा दारिद्र्य रेषेखालील असलेले पिवळे रेशनकार्ड पुरावा व वरील व्यतिरिक्त पुणे मनपाच्या कार्यक्षेत्रात राहत असलेल्या केशरी रेशनकार्डधारक ज्यांचे वार्षिक उत्पन्न र.रु. एक लाखपर्यंत असलेला मा. तहसीलदार, पुणे यांचा दाखला.
२) पुणे मनपा कार्यक्षेत्रातील पिवळे किंवा केशरी रेशनकार्ड
३) अपत्यांचे आधारकार्ड (वय वर्ष २५ खालील)
४) कुटुंबातील पात्र सर्व सभासदांचे आधारकार्ड (पुणे मनपा कार्यक्षेत्रातील)
५) कुटुंबातील पात्र सर्व सभासदांचे दोन फोटो (आयकार्ड साईझ)
६) सदर योजनेची नोंदणी फी रु. १००/- वार्षिक शुल्क रु. १००/- अशी एकूण रक्कम र.रु. २००/- शुल्क आकारण्यात येत आहे.

शहरी गरीब योजना राबविताना पारदर्शकता येण्यासाठी माहे सप्टेंबर २०२२ पासून संगणक प्रणाली राबवण्यात येत आहे. बरेचसे रुग्ण हे रुग्णालयात दाखल झाल्यानंतर सदर योजनेचे कार्ड काढून रुग्णालयात दाखल झाल्यापासूनचे लाभ मिळण्याची मागणी करीत आहेत. सन २०२३ २०२४ च्या आर्थिक वर्षापासून प्रत्येक आर्थिक वर्षात शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेच्या नियम व अटीशर्तीनुसार पुणे मनपा कार्यक्षेत्रातील नागरिकांनी पॅनेलवरील समाविष्ट असणाऱ्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट पेशंटसाठी हमीपत्र देण्याची प्रक्रिया पूर्णतः ऑनलाईन करण्यात येणार असून त्याकरीता शहरी गरीब योजनेच्या धोरणानुसार सदर योजनेचे सभासद कार्ड ॲडमिशन पूर्वी तयार केलेले असणे पेशंटला अनिवार्य आहे तसेच सभासदत्वाच्या दिनांकापासून वैद्यकीय उपचाराच्या बिलांची प्रतीपूर्ती अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेच्या नियमानुसार पुणे मनपाकडून देय राहील. तरी सर्व नागरिकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ. मनिषा विनोद नाईक)
सहायक आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

सही/-
(डॉ. भगवान पवार)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/३३६ दि. २३/६/२०२३

विद्यार्थी सहायक समितीला साडेतीन लाख डॉलर

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अमेरिकेतील रजनी व अशोक शेंदुरे परिवाराने विद्यार्थी सहायक समितीच्या पुण्यातील मुलींच्या वसतिगृहासाठी साडेतीन लाख डॉलरची (सुमारे दोन कोटी ८० लाख रुपये) देणगी नुकतीच जाहीर केली.

परवडणारा दर आणि सुरक्षितता या दृष्टीने पुण्यात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या ग्रामीण भागातील मुलींचा कल समितीकडे असतो. मात्र, मर्यादित जागांमुळे प्रवेशाला अडचणी येत होत्या. त्यामुळे समितीने शिवाजी हाउसिंग सोसायटीजवळील जागेत मुलींसाठी वसतिगृहाचे बांधकाम सुरू केले आहे. वसतिगृहाच्या एका 'विंग'साठी देणगी देण्यात आली.

शेंदुरे परिवार मूळ कोल्हापूरजवळील असून, ५०हून अधिक वर्षे अमेरिकेत आहेत. महाराष्ट्र फाउंडेशनचे अध्यक्ष राजीव भालेराव काही महिन्यांपूर्वी पुण्यात समितीचे काम पाहण्यासाठी आले होते. या कामाला आर्थिक मदत उभारण्याचे त्यांनी आश्वासन दिले होते. त्यांनी शेंदुरे परिवाराशी समितीच्या कामाबाबत चर्चा करून देणगीबाबत विनंती केली होती.

अमित रुके

भाई वैद्य पुरस्कार वितरणप्रसंगी डॉ. सूरज एंगडे, रावसाहेब कसबे आदी.

युवकांनो, मार्ग बदला

डॉ. सूरज एंगडे यांचे आवाहन

पुणे : 'बेरोजगार आणि उपाशीपोटी असणाऱ्या व्यक्ती राष्ट्रवाद म्हणून झेंडे घेऊन फिरत आहेत. आंदोलनांत सहभागी युवकांनी व्यक्तिगत जीवनाशी त्याचा संबंध आहे का, हे पाहिले पाहिजे. 'राष्ट्रवाद' ज्यांच्यासाठी म्हणत आहेत, त्यांची मुले परदेशात शिकत आहेत. त्यामुळे युवकांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे,' असे सांगून दलित चळवळीचे युवा अभ्यासक आणि ऑक्सफर्ड, हार्वर्ड विद्यापीठातील स्कॉलर डॉ. सूरज एंगडे यांनी युवकांना मार्ग बदलण्याचे आवाहन केले.

भाई वैद्य यांच्या ९५व्या जयंतीनिमित्त भाई वैद्य फाउंडेशन आणि आरोग्य सेनेतर्फे डॉ. एंगडे यांना 'लोकनेते भाई वैद्य युवा नेता राष्ट्रीय पुरस्कार' आणि चंद्रपूर येथील आदिवासी भागातील शाळेच्या शिक्षिका वैशाली पुंडलिकराव अंजली गेडाम यांना 'प्रा. नलिनीताई वैद्य समाजाभिमुख शिक्षक राज्य पुरस्कार' ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. आरोग्य सेनेचे अध्यक्ष डॉ. अभिजित वैद्य, लक्ष्मीकांत मुंदडा, डॉ. गीतांजली वैद्य उपस्थित होते.

'शिक्षण वेदनादायी नव्हे, तर आनंददायी होणे आवश्यक आहे. शिक्षण चौकटीत बांधून ठेवले असून, ते परावलंबी आणि बंदिस्त झाले आहे. शिक्षकांनी शिक्षण प्रक्रियेत अडथळा न ठरता, सहकार्याची भूमिका घेतल्यास शिक्षण अधिक चांगले होईल,' असे गेडाम यांनी सांगितले.

देशात समान नागरी कायदा लागू होण्याची गरज कसबे यांनी व्यक्त केली. वैद्य यांनी मनोगत व्यक्त केले.